# * प्रतिज्ञापत्र *

अरूणा ढेरे यांच्या 'मनातलं आभाळ' व 'आठवणींतले आंगण' या ललितलेखसंग्रहांवर आधारित सदरचा लघुप्रबंध मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल्. (मराठी) पदवीसाठी लिहिलेला आहे. हा लघुप्रबंध अथवा त्यातील कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

कोल्हापूर :

दिनांक : 19-12-08

अभ्यासक

**गिरी रेखा यशवंतराव**

# * ऋणनिर्देश *

शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल् पदवी परीक्षेसाठी 'अरूणा ढेरे' यांच्या 'मनातलं आभाळ' आणि 'आठवणींतले आंगण' या ललितलेखसंग्रहांच्या आधारे हा लघुप्रबंध सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

अरूणा ढेरे यांच्या 'आठवणींतले आंगण' व 'मनातलं आभाळ' या ललितलेखसंग्रहांतून त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रकट होते. पुण्यातील शनिवार वाड्याजवळ राहत असलेल्या घराच्या, आसपासच्या आठवणी, गतजीवनातील अनुभव या पुस्तकात चित्रित केलेले आहेत. त्यांचा काव्याचा ओढा त्यांच्या लेखनातून स्पष्ट होतो. त्यांच्या लेखनातून त्या भावनिक, श्रध्दाळू, धार्मिक प्रवृत्तीच्या लेखिका वाटतात. पोवाड्यासारखी वीर,करूण रसाची गीते ऐकण्याची आवड लेखिकेला दिसते. त्या भूतकाळातील गीतांमध्ये आधुनिकता शोधण्याचा प्रयत्न करतात.

जेव्हा जेव्हा मी 'मनातलं आभाळ' व 'आठवणींतले आंगण' या ललितचा अभ्यास करत होते. तेव्हा त्यांनी चित्रित केलेले खेडेगावातील आंगण, शेणाचे सारवण, रांगोळी काढणे, फुले वेचणे, जात्यावरच्या ओव्या, बैलगाडीतून प्रवास करणे, नदीचा पूर, निसर्ग, संस्कृती हे सर्व माझ्या परिचयाची व अनुभवाची वाटायची.

लघुप्रबंध लेखनाचे श्रेय हे केवळ एका व्यक्तीचे नसते. हिरव्यागार झाडाच्या वाढीसाठी त्याला जसे हवा, पाणी, खत, सूर्यप्रकाश इ. ची आवश्यकता असते. त्याप्रमाणेच, या लघुप्रबंधाच्या निर्मितीसाठी मला अनेकांचे श्रेय लाभले. 'गुरू' हे शिष्याच्या आयुष्याला

मार्ग देणारे, ज्ञान देणारे असतात. त्यापैकीच डॉ. प्रकाश कुंभार यांनी सुरूवातीपासूनच मला लेखनाची प्रेरणा दिली. आपले वाचन विविधांगी स्वरूपाचे असावे, स्वत:ला काय वाटते ते यथार्थ शब्दांमध्ये मांडता यावे हा विचार त्यांनीच माझ्यात रूजवला. सातत्याने जागरूक राहून वरचेवर काम पाहिले. अशा या गुरूंची मी सदैव ऋणी आहे. त्यांच्या ऋणातच रहावे असे अधिक वाटते.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ.रविंद्र ठाकूर , डॉ. कृष्णा किरवले,डॉ. रणधीर शिंदे व प्रा. हिमांशू स्मार्त इ. गुरूजन वर्गाने योग्य व अचूक मार्गदर्शन केले.

या लघुप्रबंधासाठी सिंहाचा वाटा उचलणारे माझे वडील, आई यांचे चिरदायी आशीर्वाद, शुध्दलेखनासाठी वडीलांनी केलेले मार्गदर्शन, दीपस्तंभाप्रमाणे वादळातील नौकेला मार्गदर्शन करणाऱ्या माझ्या आदरणीय सौ. शोभा श्रीकांत हिरेमठ. सुमती, रूपलता, राजश्री, बसवलिंग, शिवलिंग या माझ्या भावंडांनी दिलेले प्रोत्साहन डॉ. सुमन बुवा, डॉ. बलभीम चव्हाण, सुवर्णा बुवा, सौ. रजनी मेघानी, अजित देसाई, वृषाली कुलकर्णी मॅडम सौ.शुभांगी सुरेश बुवा, सौ.सिमा सुहास बुवा यांनी आर्थिकरूपी केलेली मदत व सौ.प्रिती शिंदे, सौ.सुनिता फुले, स्नेहल, तेजश्री, प्रदीप व दिपक शिंदे या मित्र–मैत्रिणींनी दिलेली प्रेरणा. त्यामुळेच हे लेखन पूर्ण होऊ शकले. या सर्वांची मी ऋणी आहे.

या लघुप्रबंधासाठी अरूणा ढेरे यांनी मला सहकार्य केले. त्याबद्दल मी त्यांची हार्दिक ऋणी आहे.

आत्मकथनपर गौरव होणाऱ्या मराठी साहित्यात माझी ही थोडीसी आत्मकथा मांडली. ती केवळ मनमोकळे करण्यासाठी. संत परंपरेतील शेगांव संत श्री गजानन महाराज, परमपूज्य गुरूदेवता श्री कलावतीदेवी अनगोळ, बेळगाव. डॉ. घाळी शिक्षण संस्था, रयत शिक्षण संस्था यांच्यामुळे माझा आत्मविश्वास वाढला. मी नोकरी करीत असलेल्या राधाबाई शिंदे इंग्लिश मिडीयम स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ.अनुजा वणकुद्रे मॅडम यांनी मला दिलेला पाठींबा. यामुळे माझा सर्वांगीण विकास होण्यासाठी मोलाची मदत झाली. या ऋणाची नोंद व्हावी म्हणूनच मी हे लिहिले आहे.

संगणकीय अक्षरजुळणीचे काम कु.कविता तानाजी गायकवाड व कु.गणेश बाळू सुतार (गणेश कॉम्प्यूटर्स) यांनी अल्पावधीत व आकर्षक स्वरूपात केले. त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : १३ /१२ / २००८

अभ्यासक

**गिरी रेखा यशवंतराव**

# विषय निवडण्यामागची भूमिका

मी जेव्हा एम्.फिल् ला प्रवेश घेतला तेव्हा 'संशोधन करणे' ही संकल्पना मला नवीनच होती. नेमके संशोधन म्हणजे काय अशा मी विचारात असायची. कोणता विषय निवडावा, कशा पद्धतीने संशोधन करावे, याविषयी मी पूर्णत: अजाण होते. जेव्हा मी मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रकाश कुंभार सर यांची निवड केली व मी सरांना भेटायला गेले.सरांनी मला सांगितले की तुम्ही स्वत: सात–आठ विषय माझ्यासमोर ठेवा मी त्यातला एखादा विषय जो तुम्हाला योग्य आहे तो सांगेन. मी दहा विषय काढले होते. पण जेंव्हा विद्यापीठात त्या विषयांवर संशोधन झालेले आहे. काहींवर चालू आहे हे समजताच परत मी सरांना भेटायला गेले.

अरूणा ढेरेंचे 'मनातलं आभाळ' (मंजुल प्रकाशन) व 'आठवणींतले आंगण' (पद्मगंधा प्रकाशन) या दोन पुस्तकांवर पूर्वी संशोधन झालेले नाही अशी खात्री करून घेऊन मी हा विषय निवडला. खरोखरीच किती अनमोल व मोलाचा लोकसाहित्याचा ठेवा या पुस्तकांनी जपला आहे. जर सरांनी मला ही पुस्तके व विषय सुचवला नसता तर खरोखरीच मी या लक्षणीय लेखनाच्या वाचनावाचून मुकले असते. मला असा 'ग्रामसाक्षात्कार' झाला नसता.

अरूणा ढेरे यांनी 'मनातलं आभाळ' व 'आठवणीतले आंगण' या दोन पुस्तकांमधून त्यांना भावलेला ग्रामसंस्कृतीचा व लोकसाहित्याचा अनमोल ठेवा या पुस्तकांतून जतन केला आहे. शाश्वत व अशाश्वत, निसर्गातून मानवी जीवनात प्रवेश, मानवी मनाचे आचार–विचार, ग्रामसंस्कृती, लोकमानस, श्रद्धा–अंधश्रद्धा, लोकसाहित्य, व्यक्तिचित्रणे व प्रवासवर्णने या साऱ्यांचा एक वैचारिक दृष्टिने विचार करून लेखिकेने चित्रण केलेले आहे. ते मला अधिक

भावले. ग्रामजीवनात वाचकाला पोहोचविण्यासाठी ग्रामीण बोलीपेक्षा शहरी बोली किती परिणामकारकपणे कार्य करू शकते याची प्रचिती लेखिकेच्या लेखनातून सहज येते. ही पुस्तके, निवडण्यामागील मुख्य कारण म्हणजे 'लोकसाहित्य' हा ग्रामीण संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे. तो जतन करण्याचे काम या दोन पुस्तकांतून झालेले आहे. ही पुस्तके वाचता वाचता त्यातील घटना, प्रसंग हे नकळत वाचकाचे स्वत:चेच होऊन जातात. त्याच्याच जीवनातील बारकाईने केलेले लिखाण आहे. हे मलाच म्हणायचे होते, अशी जेव्हा वाचकाची स्थिती होते तेव्हा तिथे लेखिकेचा विजय झालेला आपणांस दिसून येतो. अरूणा ढेरे यांनी त्यांच्या दोन्ही पुस्तकातून ग्रामीण लोकहृदयाचा वेध घेतलेला आपणांस दिसतो. हे ईप्सित साध्य करताना त्यांनी सहजतेने लेखन केलेले असून ते उच्च पातळीपर्यंत जाणारे दिसते.

जागरूक वाचक निर्माण करण्याचे, जीवनाकडे पाहण्याची वेगळी दृष्टी, शाश्वत अशाश्वताचा विचार, निसर्गाचे मानवी जीवनाशी असणारे नाते स्पष्ट करणारे, दृष्टीला दिसणाऱ्या सृष्टीत वेगळेपणा शोधण्याची चौकसवृत्ती वाचकामध्ये निर्माण करण्याचे परमोत्कर्ष कार्य अरूणा ढेरेंच्या लेखनाने केले आहे. जे जे जुने आहे ते सारं टाकून द्यायचं नसतं व जे जे नवं आहे ते ते सर्व घ्यायचच नसतं. जुन्या नव्याचा मध्य साधून संस्कृतीस पोषक असं वातावरण अवती-भवती असले म्हणजे माणसांची मने टवटवीत राहतात. आपल्या दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटना ज्या आपल्या दृष्टीला दिसल्या नाहीत पण त्या लेखिकेने यथार्थतेने टिपल्या हे पाहून वाचक खूश होतो. शहरी वाचकालासुद्धा ग्रामीण भागात फेरफटका मारून आल्याचे समाधान लाभते हे या लेखनाचे वैशिष्टय आहे. म्हणून मी अरूणा ढेरेंच्या 'मनातलं आभाळ' व 'आठवणींतले आंगण' या ललित लेखसंग्रहांतील विशेष शोधण्यासाठी हा विषय निवडला.

जे अनुभवले, जे पाहिले बालपणी ज्या घटना घडल्या, जे जे शाश्वत चिरंतन विचार मनात प्रकटले ते ते सर्व लेखिकेने आपल्या कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त उठावदारपणे व शैलीबद्ध रितीने हुबेहुब वर्णन केले आहे. ललितचा आत्मा म्हणजेच हुबेहुब वर्णन व 'मी' चा अविष्कार होय. तो लेखिकेला साधला आहे. म्हणून ह्या दोन साहित्यकृती संशोधनासाठी यथार्थ वाटतात.